## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 20/03/2020 (शुक्रवार)
## (सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 3 कि.मी अंतरावर चक्रधर स्वामी मंदिर जवळ लिंगा येथे दिनांक 18/03/2020 चे 22.00 वा. ते दिनांक 19/03/2020 चे 10.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– संजय पुंडलिकराव बागडे, वय 45 वर्ष, रा. हत्तीखाना काटोल यांची एमएच– 40/बीएन–9036 क्रमांकाची हिरो कंपनीची हिरव्या रंगाची मोपेड गाडी किं. 20,000/–रू. ची बंद पडल्याने व ती चालु होत नसल्याने फिर्यादीने गाडी चक्रधर स्वामी मंदिर जवळ उभी ठेवली. दुसऱ्या दिवशी जावुन पाहीले तर गाडी तिथे दिसली नाही. फिर्यादींची मोपेड गाडी अज्ञात आरोपीने चोरून नेली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रभाकर घोडमारे हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील बाजारगाव शिवार अमरीक ढाब्या समोर येथे दिनांक 13/03/2020 चे 04:30 वा. दरम्यान एमएच– 46/पी– 8083 क्रमांकाची स्कॉरपीयो चा चालक आरोपी नामे– जियावुल हक्क अब्दुल हक्क, वय 35 वर्ष, रा. आनसिंग ता.जि. वाशिम याने अमरीक ढाब्या जवळ सदर आरोपी वाहकाचा ताबा सुटल्याने वाहन डांबरी रोडच्या खाली 30 मिटर पर्यंत घासत जावुन सदर वाहन उलटले. आरोपी यास अपघातात डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री ठाकरे 8888157262 हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. नरखेड :– दिनांक 19/03/2020 चे 15:30 वा. ते 17.00 वा. चे सुमारास आरोपी नामे– शब्बीर बब्बु शहा, वय 26 वर्ष, रा. नरखेड याने 13 वर्षीय पिडीत/फिर्यादी हिच्या राहत्या घरी प्रवेश करून 'तु मेरे साथ चल, नही तो तेरा व्हिडीओ व्हायरल करूंगा'? असे धमकावुन तिला जबरदस्तीने तिचे पालकांचे कायदेशीर रखवालीतुन, जबरदस्तीने मोटारसायकल वर बसवुन पिंपळगाव वखाजी येथील तलावावर नेवुन तिच्या गालावर चापट मारून, बळजबरीने तिच्याशी जबरी संभोग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 376 (2) जे, 376 (3), 363, 323, 506 भादंवि. सहकलम 4 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. खुटेमाटे 9673803224 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– दिनांक 17/03/2020 चे 11.00 वा. दरम्यान आरोपी नामे– अनिल मनोहर वासनिक, वय 22 वर्ष, रा. पिंडकेपार, ता. जि. गोंदिया, ह. मु. टेंभरी, ता. हिगंणा, जि. नागपूर याने 15 वर्षीय फिर्यादी/पीडित हिचा वारंवार पाठलाग करून तिचे आई–वडील घरी नसतांना अल्पवयीन मुलीला दारू पिण्याकरिता पाणी मागीतले. पीडितेने आरोपीला पाणी न दिल्याने तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354(ड), (1) भादंवी. सहकलम 12 बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दिनकर दराडे 8975479600 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर